# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र   जिल्हा District: मुंबई   पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि.   प्रथम खबर क्रमांक FIR No.: २१०   वर्ष Year: २०१८   दिनांक Date: २४/०८/२०१८

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र.का. अधि. १९८८   कलमे Sections: ७, १२.
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना वार: मंगळवार   दिनांकापासून: ६/०८/१८   वेळ   दिनांकापर्यंत: २३/०८/१८   वेळ
   Occurrence of offence: Day   Date from   Time   Date to   Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00   (2) 03.00 ते 06.00   (3) 06.00 ते 09.00   (4) 09.00 ते 12.00   (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00   (7) 18.00 ते 21.00   (8) 21.00 ते 24.00   (9) 06.00 ते 18.00   (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याचा तारीख: २३/०८/२०१८   वेळ ........
   Information received at P.S. Date   Time
   (c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र.: १३/२०१८   तारीख: २४/०८/२०१८   वेळ: ११.४०
   General Diary Reference : Entry No.   Date   Time

4. माहितीचा प्रकार Type of Information: प्रत्यक्ष   लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S.   Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: मनी २ मनी फायनान्स प्रा.लि. ८/१८ पहिला मजला प्रभदेव रेजन्सी, मॅकडोनाल्ड जवळ, मीरा भाईंदर रोड
   Naka/Lane   Ward   Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
   Nearest identifiable Place   Village   Post   Taluka   Distt.   State
   (c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station   Taluka   Distt.   State

6. तक्रारदार / खबर देणाऱ्याचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: श्री. गोपाललाल प्रजापती   (b) वडीलांचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: लक्ष्मीलाल प्रजापती
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: वय ३४ वर्षे   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय   फोन नं. Phone No.: 8779673593
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation: सोन्याचा व्यापारी
   (g) धर्म Religion ........ जात Caste ........ पोटजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address: A/1805 समृद्धी टॉवर, इंद्रलोक फेस-6 भाईंदर (पु)
   Address   Ward   House/Name No.   Phone M. No.   Pan No.   Card No.
   रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो. स्टे. ........
   Road   Nearest identifiable place   Village   Post   P. Stn.
   तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
   Taluka   Distt.   State   Present Address

7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   १) आलोक अशोक गायकवाड, वय ४५ वर्षे, धंदा नोकरी पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन
   आर्थिक गुन्हे शाखा, रा.ठी. ८०३/ब विंग आनंद सागर को. ऑप.हौ.सो. स्वीपर
   बसडेपो जवळ नवघर रोड. (पु)
   २) सत्यजीत ईसम नामदेव सुरेश कानडी, वय ४० वर्षे धंदा मेन बँकींग कंपनीचा संचालक
   रा.ठी: बी/ 403, 404, दीपमाला-1 को ऑप.हौ.सो. पुनम सागर कॉम्प्लेक्स मीरा रोड
   पूर्व

अ

Scanned with OKEN Scanner

खालील फिर्यादी नामे श्री. गोपाललाल मक्खीलाल प्रजापती वय २४ वर्षे यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

(signature) 24/08/2017

(शि. मा. भाले)
सहायक पोलीस आयुक्त
ल. प्र. वि. मुंबई

— फिर्याद —                    दिनांक—२४/०८/२०१९

श्री. गोपाललाल लक्ष्मीलाल प्रजापती, वय ३४ वर्षे, धंदा— ज्वेलरी व्यवसाय, राठि— ए १८०५, समृध्दी टॉवर, इंद्रलोक, फेस—६, भाईदर (पूर्व), जि. ठाणे, पिन कोड क्र. ४०११०५, मो.क्र. ८७७९६७३५९३.

...

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझी पत्नी नामे पिंकी, मुलगी हर्शिता, मुलगा जयदिप यांचे सह गेल्या एक वर्षापासून रहातो. माझा ज्वेलरी खरेदी विक्रीचा व्यवसाय असून मी वेगवेगळया बँकामधील लिलावातील सोने खरेदी करण्याचा व्यवसाय करतो. माझे अभुषण गोल्ड नावाने दुकान असून ते शॉप नं.—१९, रश्मी दृष्टांत, हाटकेश रोड, मिरा रोड (पूर्व), जि. ठाणे या ठिकाणी आहे. सदर व्यवसायातून मिळणाऱ्या नफ्यातून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

दिनांक ०३/०८/२०१९ रोजी मी माझे दुकानावर असताना, माझे रहाते घरी क्राईम ब्रँच मुंबई येथून दोन व्यक्ती आल्या व त्यांनी माझे पत्नीकडे माझ्या नावाने इग्रजीमध्ये लिहीलेले पत्र देवून त्यावर तीची स्वाक्षरी घेतली. सदर व्यक्तीनी ''आम्ही क्राईम ब्रँच मधून आलो असून तुमच्या पतीस पत्र द्या तसेच कार्यालयात येण्यापूर्वी पत्रामध्ये नमुद असलेल्या दुरध्वनीवर संपर्क करुन येण्यास सांगा.'' असे सांगून निघुन गेले. त्यानंतर माझे पत्नीने माझे मोबाईलवर संपर्क साधून मला माहिती दिली. मी त्वरीत दुकानातून घरी आलो. माझे पत्नीने मला पत्र दाखविले ते पत्र इग्रजीमध्ये टंकलिखीत केलेले होते. सदर पत्र मी वाचून पाहिले असता त्यामध्ये कलम १६०फौ. द.प्र.सं. असे नमुद असून पत्रावर संतोष गायकर, पोलीस निरीक्षक, प्रॉपर्टी सेल, डी. सी.बी. सी.आय.डी., मुंबई यांचे नांव व त्यावर स्वाक्षरी होती. पत्रामध्ये डी.सी.बी., सी.आय.डी, प्रॉपर्टी सेल, मुंबई गु.र.क्र. ६५/२०१९, कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ भा.द.वि. या गुन्ह्याचे चौकशी करीता पत्र मिळाल्या पासून तीन दिवसाचे आत हजर रहाणेबाबत नमुद करण्यात आले होते.

प्राप्त पत्रातील मजकुरा नुसार मी दिनांक ०५/०८/२०१९ रोजी दुपारी १२.००वा. चे दरम्यान गुन्हे शाखा, प्रॉपर्टी सेल ३रा मजला, भायखळा, मुंबई येथे जावून पोलीस निरीक्षक संतोष गायकर साहेब यांना भेटलो. त्यांनी मला प्रथम त्यांचे वरील नमुद गुन्हयाबाबत चौकशी करुन गुन्हयातील अटक विमल सोनी व दिनेश सोनी यांना ओळखतो का? अशी विचारणा केली असता मी त्यांना ओळखतो असे सांगितले. त्यानंतर कशी ओळख झाली असे विचारले असता नमुद दोघे मनपुरम फायनान्स, भाईदर शाखा येथे माझी तीन वर्षापूर्वी भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी मला आजून कोठे सोने तारण ठेवून लोन दिले जाते याबाबत विचारणा केली होती म्हणून मी त्यांना 'मनी २ मी' या फायनान्स कंपनीचे नांव व फोन नंबर दिला होता. माझा त्यांच्याशी कोणताही संबंध नसल्याबाबत मी संतोष गायकर साहेब यांना सांगितले. त्यानतर त्यांनी माझ्या वैयक्तीक व्यवसाय व प्रॉपर्टी संदर्भात चौकशी सुरु केली. मी माझ्या व्यवसाया संदर्भात माहिती दिल्या नंतर त्यांनी मला तु सोने तारण ठेवतोस का? तुझ्याकडे सोने तारण ठेवण्याचे लायसन आहे का? अशी विचारणा

Scanned with OKEN Scanner

केली. त्यावर जर कोणी ग्राहक आल्यास मी सोन तारण ठेवून लोन देतो, तसेच सोने तारण परवान्या करीता मी शांतीनगर नगरपालिका, काशिमीरा येथे कागदपत्र दिलेली आहेत त्या संदर्भात पोलीस व्हेरिफीकेशन झालेले आहे. तेव्हा संतोष गायकर साहेब मला म्हणाले की, म्हणजे तु बेकायदेशीर धंदा करतोस? तुझ्या बेकायदेशीर सोन तारणा बाबत मी 'मुथूट फायनान्स व मनपुरम फायनान्स कंपनीस तसेच आयकर विभागास पत्र पाठवून तुझी माहिती गोळा करुन तुझ्यावर कारवाई करणार आहे असे सांगून त्यांनी त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यांना माझा जबाब नोंद करण्यास सांगितले. संतोष गायकर साहेबांच्या सांगण्या प्रमाणे एका पोलीस कर्मचाऱ्याने ४ ते ५ पानाचा माझा जबाब लिहीला, परंतू सदर जबाबावर माझी सही घेतली नाही.

माझा जबाब श्री. संतोष गायकर साहेब यांचेकडे दिला. त्यावर संतोष गायकर साहेबांनी मला तुझ्या व्यवसायाबाबत मला सर्व माहिती मिळालेली आहे जर तुझ्यावर कारवाई होवू नये असे वाटत असेल तर हाताची पाच बोटे दाखवून रु. ५,००,०००/— द्यावे लागतील असे सांगितले. त्यावर मी साहेब माझा सोनीशी व गुन्हयाशी काय संबध आहे असे विचारले असता संतोष गायकर साहेब यांनी मला बाहेर बस आणि विचार करुन १५ मिनिटात मला सांग असे सांगून बाहेर थांबण्यास सांगितले.

मी संतोष गायकर साहेबांच्या सांगण्या प्रमाणे त्यांच्या केबीनचे बाहेर खुर्चीवर बसलो. माझा सोनी व त्याचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाशी कांहीही संबध नसल्याने त्यांना पैसे देणे माझ्या मनाला पटले नाही म्हणून मी श्री. संतोष गायकर साहेबांना पुन्हा भेटून मी विचार करुन नंतर येवून भेटतो व सांगतो असे सांगून, रात्री ०८.००वा.चे दरम्यान घरी जाणेसाठी कार्यालयाचे बाहेर आलो. इमारतीचे खाली गेट जवळ मला माझा जबाब नोंदविणारा व त्यांचे सोबत काम करणारा असे दोन पोलीस अंमलदार भेटले. त्यापैकी माझा जबाब नोंदविणारे पोलीस अंमलदार यांनी मला आता तु घरी जा, सकाळच्या वेळी साहेबांचा मुड चांगला असतो, तु उद्या सकाळी येवून साहेबांना भेट. तुझ्या चौकशीची पत्रे फायनान्स कंपनीला पाठविणार नाहीत असे सांगितले. त्यावर मी ठिक आहे असे बोलून घरी जाणेस निघालो.

माझा कोणताही गुन्हा नसताना श्री. संतोष गायकर साहेब यांनी माझेकडे लाच मागीतली म्हणून मी त्यांचे विरुध्द लाचलुचपत विभाग येथे तक्रार करण्याचे ठरविले. मी मिरा रोड येथे जाणे करीता दादर रेल्वे स्टेशनवर येवून थांबलो. श्री. संतोष गायकर साहेब यांना मला लाच द्यायची नसल्याने मी दादर स्टेशन येथून माझे मोबाईलवरुन

समक्ष

(स्वाक्षरी) 24/08/19

( शिवाजी मा. माने )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

(स्वाक्षरी) 24/08/2019

Scanned with OKEN Scanner

जष्ट डायल मार्फत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक मिळविला. व माझे मोबाईलवरुन मिळालेल्या फोन क्रमांक ०२२२४९२२६१८ या क्रमांकावर संपर्क करुन तेथील अधिकारी यांना मला एका लोकसेवका विरुध्द लाच मागितल्याबद्दल तकार करणेची असल्याचे सांगितले. तेथील अधिकारी यांनी माझा मोबाईल नंबर लिहून घेतला व आमचे वरिष्ठ अधिकारी तुम्हाला फोन करतील असे सांगितले.

त्यानंतर मी माझे भाईंदर येथे घरी आलो. रात्री ११.३०वा. चे दरम्यान माझे मोबाईलवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामधील स.पो.आ. शिवाजी माने यांचा फोन आला व त्यांनी मला दिनांक ०६/०८/२०१९ रोजी सकाळी कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले.

मी दिनांक ०६/०८/१९ रोजी दुपारी ०१.००वा. ला.प्र.वि., मुंबई येथील कार्यालयात जावून स.पो.आ. शिवाजी माने साहेब यांना भेटलो. त्यांनी माझी तक्रार ऐकूण घेवून मला वरिष्ठांकडे घेवून गेले. तेथे माझ्या तक्रारी संदर्भात माहिती घेतली व लेखी अर्ज देण्यास सांगितले. त्यानुसार मी माझे स्वहस्ताक्षरात लिहीलेला तक्रार अर्ज दिला. मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी शासकिय पंचा समक्ष करणे आवश्यक असल्याचे सपोआ शिवाजी माने यांनी सांगितले.

त्यानंतर थोडयाच वेळात सपोआ शिवाजी माने यांनी दोन शासकिय पंचाना बोलावून त्यांना माझी ओळख करुन देवून, माझा तक्रार अर्ज वाचण्यास दिला. पंचानी तक्रार अर्ज वाचून पाहिल्या नंतर त्यावर पंच म्हणून सहया केल्या व सपोआ शिवाजी माने साहेब यांनी समक्ष म्हणून सही करुन सदर अर्ज ताब्यात घेतला.

त्यानंतर सपोआ शिवाजी माने यांनी मला पडताळणी पथकातील अधिकारी व अंमलदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर शासकिय पंचा समक्ष मी सरकारी अधिकारी विरुध्द केलेल्या तकारीच्या अनुषंगाने सपोआ शिवाजी माने यांचे, माझे व पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर शासकिय वाहनाने पोलीस पथक व दोन पंच यांचेसह श्री. संतोष गायकर यांचे कार्यालय भायखळा येथे त्यांची भेट घेण्याकरीता भायखळा येथे गेलो. सपोआ शिवाजी माने यांनी दिलेल्या माहिती प्रमाणे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टाचे आतील बाजूस बनियनला लावून, मला पंच अमोलकुमार रामेश्वर म्हसाळ यांचेसह श्री. संतोष गायकर साहेब यांचे कार्यालयात भेट घेण्यास पाठविण्यात आले. मी पंच श्री. म्हसाळ यांचे सोबत श्री. संतोष गायकर यांचे कार्यालयात पोहचलो व श्री. संतोष गायकर साहेब

समक्ष

( शिवाजी मा. माने )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

यांची भेट घेतली असता त्यांनी मला ''तुला मी बोलाविलेले नाही. तु येवू नको? तुझी स्टेटमेन्ट झालेली आहे.'' असे सांगून जाण्यास सांगितले त्यामुळे मी पंच श्री. म्हसाळ यांचेसह पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सपोआ शिवाजी माने यांनी माझ्या शर्टाच्या आतील बाजूस लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी पोलीस पथक व पंचासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे परत आलो. सपोआ शिवाजी माने यांनी पडताळणीची कारवाई पुर्ण केली व मला घरी जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी माझे रहाते ठिकाणी भाईंदर येथे गेलो.

दिनांक ०९/०८/१९ रोजी दुपारी १२.००वा. चे दरम्यान माझे रहाते सोसायटीमध्ये तीन पोलीस आले व त्यांनी सोसायटीचे वॉचमन यांना घरी पाठवून मी घरी आहे का याबाबत चौकशी केली असल्या बाबत मला माझे पत्नीने फोनवरुन कळविले. मी त्वरीत श्री. संतोष गायकर साहेबांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९८७०३२४९२८ वर संपर्क करुन माझेकडे क्राईम ब्रँचचे पोलीस का आले आहेत अशी विचारणा केली. तेव्हा त्यांनी मला सायकांळी ०६.००वा. त्यांचे भायखळा येथील कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले. सदरची बाब मी सपोआ शिवाजी माने साहेबांना मोबाईल फोनवर संपर्क करुन सांगितली. सपोआ शिवाजी माने यांनी मला पुन्हा पंचासमक्ष पडताळणी करणे आवश्यक असल्याने सायंकाळी ०५.००वा. भायखळा रेल्वे स्टेशन जवळ येण्यास सांगितले. मी सपोआ शिवाजी माने यांच्या सुचने प्रमाणे साधारण ०६.००वा. भायखळा रेल्वे स्टेशन येथे पोहचलो. तेथे सपोआ शिवाजी माने साहेब त्यांचे पथक, पंचासह हजर होते. सपोआ शिवाजी माने यांनी मला व पंचास सुचना देवून पडताळणी करीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर शर्टाच्या आतील बाजूस लावून पंच श्री. म्हासाळ यांचे सोबत श्री. संतोष गायकर साहेब यांना भेटण्यास पाठविले. मी व पंच श्री. म्हसाळ असे श्री. संतोष गायकर साहेबांचे कार्यालयात गेलो असता तेथील अंमलदार यांनी ''साहेब अद्याप कार्यालयात आले नाहीत ट्राफिक मध्ये अडकले असून त्यांना कार्यालयात येण्यास उशीर होईल असे सांगून थांबण्यास सांगितले. मी व पंच श्री. म्हसाळ श्री. संतोष गायकर साहेब यांची वाट पहात थांबलो. साधारण ०८.३०वा. चे दरम्यान मी पुन्हा श्री. संतोष गायकर सो यांना त्यांचे मोबाईल फोनवर फोन करुन थांबलो असल्याचे सांगितले तेव्हा त्यांनी थोडा वेळ लागेल थांबून राहा किंवा कांही काम असल्यास जावू शकता असे सांगितले. त्यानंतरही मी पंचासह थांबून राहिलो. सुमारे ०९.००वा. चे सुमारास श्री. संतोष गायकर सो यांनी त्यांचे कार्यालयातील फोनवर फोन करुन त्यांना कार्यालयात येण्यास रात्रीचे १२.०० वाजतील असे सांगीतले. त्यावर कार्यालयातील अंमलदार

समक्ष

(signature) 24/08/19

( शिवाजी मा. माने )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

(signature) 24/08/2019

Scanned with OKEN Scanner

यांनी मला साहेब उशीरा येणार आहेत. तुम्ही घरी जा असे सांगितले. त्यानंतर मी, पंच श्री. म्हसाळ यांचेसह पोलीस पथक थांबले होते तेथे परत आलो. सपोआ शिवाजी माने यांनी माझ्या शर्टाच्या आतील बाजूस लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात परत येवून पडताळणी संदर्भातील कामकाज पुर्ण केले. सपोआ शिवाजी माने यांनी मला घरी जाण्यास सांगितल्याने मी माझे रहाते घरी भाईदर येथे आलो.

त्यानंतर दिनांक १८/०९/१९ रोजी दुपारी ०१.००वा. च्या दरम्यान माझ्या ओळखीने व 'मनी २ मी' या फायनान्स कंपनीचे मालक श्री. नयन कांबळी यांचा माझे फोनवर फोन आला व त्यांनी मला संतोष गायकर साहेबानी उद्या १२.००वा. मिटींग ठेवली आहे तु, उद्या माझे सोबत भायखळ येथे भेट घेण्यासाठी चल असे सांगितले. त्यावेळी मी श्री. नयन कांबळी यांना माझे सकाळी थोडे काम आहे ते काम पुर्ण करुन मी भायखळा येथे श्री. संतोष गायकर साहेब यांचे कार्यालयात पोहचतो तुम्ही परस्पर तेथे पोहचा असे सांगितले व सदरची माहिती सपोआ शिवाजी माने यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करुन कळविली. सपोआ शिवाजी माने यांनी मला सकाळी १०.००वा. त्यांचे कार्यालयात येण्यास सुचना दिल्या.

सपोआ शिवाजी माने साहेब यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे मी दिनांक १९/०८/२०१९ रोजी सकाळी १०.३०वा. चे दरम्यान वरळी ला.प्र.वि. कार्यालयात पोहचलो. सपोआ शिवाजी माने साहेबांना यांना त्यांचे कार्यालयात भेटून श्री. नयन कांबळी 'मनी २ मी' या कंपनीचे मालक यांचेशी झालेल्या चर्चेची माहिती दिली. त्यानंतर सपोआ शिवाजी माने यांनी पंच व पोलीस पथकासह बोलावून लागलीच पडताळणी करीता जाण्याबाबत सुचना दिल्या. सपोआ शिवाजी माने यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे मी पंच व पोलीस पथकासह साधारण ११.००वा. भायखळा रेल्वे स्टेशन येथे पोहचलो. सपोआ शिवाजी माने यांनी मला व पंच श्री. म्हसाळ यांना पुन्हा सुचना देवून माझे शर्टाचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावला. मी व पंच श्री. म्हसाळ असे श्री. संतोष गायकर साहेब यांचे कार्यालयात त्यांना भेटण्यासाठी गेलो. श्री. संतोष गायकर साहेब यांच्या कार्यालयातील अंमलदार यांनी पंच श्री. म्हसाळ यांना बाहेर थांबण्यास सांगून माझा मोबाईल फोन त्यांचेकडे ठेवण्यास सांगितला. सदर वेळी श्री. नयन कांबळी हे तेथे हजर होते. श्री. नयन कांबळी यांनी मला श्री. संतोष गायकर साहेब यांचे समोर नेले. तेथे आमची श्री. संतोष गायकर सो यांचेशी चर्चा झाली. चर्चे दरम्यान श्री. संतोष गायकर सो यांनी मला ''नयन कांबळी जे सांगतील ते करा'' असे सांगितले. मी नयन कांबळी

समक्ष

( शिवाजी मा. माने )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

याचेशी लाचेच्या रक्कमेबाबत बोलत असताना श्री. संतोष गायकर साहेब यांनी दोघांनीही बाहेर जावून बोलण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व नयन कांबळी त्यांचे केबीनचे बाहेर आलो तेथे नयन कांबळी यांनी हाताची दोन बोटे दाखवून साहेबांनी रु. २,००,०००/– देण्यास सांगितले असल्याचे मला सांगितले. तेव्हा मी '' दोन लाख रुपये का? असे नयन कांबळी यास विचारले'' त्यावर त्यांनी होकार दर्शविला. त्यानंतर मी पुन्हा स्वत: संतोष गायकर साहेबांना भेटून विचारणा केली असता, त्यांनी मला ''जे काय आहे ते नयन कांबळी यांना सांगितले आहे, नयन कांबळी काय सांगतील त्याप्रमाणे करा, आजचे आज करा.'' असे सांगितल्याने मी बाहेर आलो तेव्हा नयन कांबळी तेथून निघून गेले होते. त्या नंतर मी, पंच श्री. म्हसाळ यांचेसह पोलीस पथक थांबले होते तेथे परत आलो. सपोआ शिवाजी माने यांनी माझ्या शर्टाच्या आतील बाजूस लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात परत येवून, सपोआ शिवाजी माने व सपोआ ढोबरे यांनी पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकूण पुढील कारवाईचे कामकाज पूर्ण केले. सपोआ शिवाजी माने यांनी मला घरी जाण्यास सांगितल्याने मी माझे रहाते घरी भाईंदर येथे आलो.

दिनांक २०/०८/१९ रोजी दुपारी ०२.०० ते ०३.००वा. चे दरम्यान श्री. नयन कांबळी यांनी माझे मोबाईल फोनवर फोन करुन ''संतोष गायकर साहेबांच्या पैशाचे काय झाले'' अशी विचारणा केली तेव्हा मी पैशाचा बंदोबस्त करत असल्याबाबत सांगून पैशाचा बंदोबस्त झाल्या नंतर मी तुम्हाला फोन करतो असे सांगितले. त्यानंतर मी सपोआ शिवाजी माने साहेब यांचे मोबाईलवर संपर्क करुन नयन कांबळीचे फोन बाबत कळविले. त्यावर सपोआ शिवाजी माने यांनी पुन्हा पडताळणी करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून, नयन कांबळी यांचा पुन्हा फोन आल्यास भेटीची वेळ निश्चित करण्याचे सांगितले.

दिनांक २२/०८/१९ रोजी दुपारी मला श्री. नयन कांबळी यांनी माझे मोबाईलवर फोनवर संपर्क करुन, साहेबांना आजच्या आज पैसे पाहिजे आहेत, नाहीतर पुन्हा फोन करणार नाही असे बोलून, संध्याकाळी ०६.०० ते ०७.००वा. पर्यंत पैसे घेवून त्यांचे 'मनी २ मी' कार्यालयात येण्यास सांगितले. श्री. नयन कांबळी यांच्या फोनवरील चर्चेची माहिती मी सपोआ शिवाजी माने यांना दिली. सपोआ शिवाजी माने यांनी मला पच व पथकासह मिरारोड येथे येत असल्याचे सांगून मला तयार रहाण्यास सुचना दिल्या. सपोआ शिवाजी माने यांच्या सुचने प्रमाणे मी तयारी करुन माझे दुकानावर थांबलो. साधारण सायंकाळी ०५.००वा.चे दरम्यान सपोआ शिवाजी माने

समक्ष

(signature) 24/08/19

( शिवाजी मा. माने )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

(signature) 24/08/19

Scanned with OKEN Scanner

पंच व पथकासह मिरारोड येथील शिवार गार्डन येथे पोहचले. सपोआ शिवाजी माने यांनी मला फोन करुन शिवार गार्डन येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी साधारण ०५.३०वा.चे दरम्यान शिवार गार्डन येथे येवून सपोआ शिवाजी माने व पथकास भेटलो. सपोआ शिवाजी माने यांनी मला श्री. नयन कांबळी यास फोन करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी नयन कांबळी यांना त्यांचे मोबाईलवर फोन करुन चौकशी केली असता त्यांनी ''ते वसई येथे कामा निमीत्त गेले असून येण्यास थोडा वेळ लागेल. असे सांगून थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पथकासह थांबून राहिलो. साधारण रात्री ०८.५० वाजे पर्यत श्री. नयन कांबळी यांची वाट पाहूनही ते न आल्याने मी त्यांना फोनवर संपर्क केला असता, त्यांनी अद्याप नालासोपारा येथेच असल्याचे सांगून आत्ता भेटू शकणार नाही, उद्या सकाळी १०.३०वा. येवून भेट असे सांगितले. त्याप्रमाणे सपोआ शिवाजी माने यांनी दिनांक २३/०८/१९ रोजी सकाळी १०.००वा. पुन्हा शिवार गार्डन येथे येण्यास सांगून पथकासह कार्यालयास निघून गेले.

दिनांक २३/०८/१९ रोजी सकाळी १०.०० वा. सपोआ शिवाजी माने हे पंच व पथकासह मिरा रोड येथील शिवार गार्डन येथे पोहचले. त्यावेळी मी तेथे हजर होतो. सपोआ शिवाजी माने यांनी पडताळणी संदर्भात पुन्हा सुचना देवून, माझे शर्टाचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन लावला. साधारण १०.४०वा. मी पच श्री. म्हसाळ यांचेसह श्री. नयन कांबळी यांना भेटणे करीता त्यांचे 'मनी २ मी' या फायनान्स कार्यालयात गेलो. श्री. नयन कांबळी यांची भेट घेण्याकरीता त्यांचे केबीनमध्ये जात असताना श्री. नयन कांबळी यांनी माझे सोबत असलेल्या पंचास हाताचा इशारा करुन बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच श्री. म्हसाळ बाहेर थांबले व मी श्री. नयन कांबळी यांच्या केबीनमध्ये जावून बसलो. श्री. नयन कांबळी यांचेशी लाचेच्या रक्कमेबाबत बोलणी केली. त्यावेळी श्री. नयन कांबळी यांनी सदरची रक्कम ही रिकवरीची नसून लोकसेवक श्री. संतोष गायकर साहेबांचीच असल्याचे सागून ठरल्या प्रमाणे पुर्ण रक्कम देण्यास सांगितले आहे. त्यावर मी माझेकडे केवळ रु. १,७०,०००/— उपलब्ध असल्याचे सांगितले. श्री. नयन कांबळी यांनी श्री. संतोष गायकर साहेब माणनार नाहीत, सांगीतल्या प्रमाणे पुर्ण रक्कम दे असे सांगितले. त्यावर मी पुन्हा श्री. नयन कांबळी यांना रु. १,७०,०००/— देणार असल्याचे सांगून सद्या रु. १,००,०००/— तयार असल्याचे व उर्वरित रु. ७०,०००/— सायंकाळ पर्यत देत असल्याचे सांगितले. त्यावर श्री. नयन कांबळी यांनी पुर्ण पैसे देण्याचे सांगून रक्कम ही लागलीच देण्यास सांगितले. मी देत असलेली रक्कम ही श्री. संतोष गायकर साहेबांची आहे की रिकवरिची नाही याची खात्री करण्याकरीता श्री. संतोष गायकर साहेबांशी फोनवरुन खात्री करुन द्या अशी

समक्ष

[signature] 24/08/19

( शिवाजी मा. माने )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

[signature] 24/08/2019

Scanned with OKEN Scanner

विनंती श्री.नयन कांबळी यांना केली. तेव्हा श्री. नयन कांबळी यांनी श्री. संतोष गायकर साहेब यांच्याशी त्यांचे झालेल्या बोलण्याची त्यांच्या मोबाईलमध्ये रेकॉर्डींग केलेले संभाषण ऐकवले. त्यानंतर श्री. नयन कांबळी यांनी श्री. संतोष गायकर साहेब यांच्या मोबाईलवर संपर्क केला असता श्री. संतोष गायकर साहेब यांनी फोन उचलला परंतू गाडी चालवत आहे असे सांगीतले. त्यावर श्री. नयन कांबळी यांनी ''गोपाललाल प्रजाप्रती रु. १,७०,०००/- घेवून आले आहेत असे सांगितले. त्यावेळी श्री. संतोष गायकर साहेब यांनी 'बर' असे सांगून नंतर फोन करतो असे सांगितले. त्यावर श्री. नयन कांबळी यांनी मला पैसे देण्यास सांगितले. मी पैसे सोबत आणले नसून अर्ध्या तासात आणून देतो असे सांगताच श्री. नयन कांबळी यांनी जर पैसे आणले नाहीत तर मला साहेबांशी कशाला बोलायला लावले अशी विचारणा केली त्यावर मी पैसे अर्ध्या तासात घेवून येतो असे सांगितले. श्री. नयन कांबळी यांनी लवकरात लवकर पैसे घेवून येण्यास सांगून पुर्ण पैसे आणण्यास सांगितले. त्यावर मी जेवढे होतील तेवढे घेवून येतो असे सांगताच श्री. नयन कांबळी यांनी रु. १,७५,०००/- घेवून ये असे सांगितले. त्यास होकार देवून मी त्यांचे केबीन मधून बाहेर येवून पंचासह पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सपोआ शिवाजी माने यांनी माझ्या शर्टाच्या आतील बाजुस लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करुन ताब्यात घेतला.

डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील माझे व श्री. नयन कांबळी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण सर्वानी ऐकूण त्याच्यात पैशाची मागणी झाल्याची खात्री केली व पुढील सापळा कारवाई संदर्भात सुचना दिल्या. श्री. नयन कांबळी यांनी माझेकडे मागीतलेली लाचेची रक्कम रु. १,७५,०००/- (रु. २,०००/- किंतीच्या ८७ भारतीय चलनी नोटा व रु. ५००/- किमतीच्या २ भारतीय चलनी नोटा) मी सपोआ शिवाजी माने यांचेकडे दिल्या. त्यांनी सदर नोटा पथकातील पोलीस अंमलदाराकडे देवून जवळच्या झेरॉक्स सेन्टर मधून नमुद नोटांवरील कमांकाच्या झेरॉक्स प्रती काढून घेतल्या व त्यावर पंचांच्या स्वाक्षऱ्या घेवून समक्ष म्हणून स्वत: स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर सदर नोंटांना पोलीस नाईक चालक क्र. ९७०८६८/ भोसले यांनी पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेतील नोटांना कापसाच्या बोळयाने अँथ्रेसिनची पावडर लावून माझे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवल्या. सपोआ शिवाजी माने यांनी श्री. नयन कांबळी यांनी पैसे स्विकारल्या नंतर रुमाल हातात घेवून तोंडावरुन फिरवून लाच स्विकारलयाबाबत सोबत असलेले पंच श्री. म्हसाळ यांना इशारा देतील व पंच श्री.म्हसाळ हे एसएमएस द्वारे ओके असे सपोआ शिवाजी माने यांच्या मोबाईलवर संदेश पाठवतील. त्यानंतर सपोआ शिवाजी माने पोलीस पथकासह श्री. नयन कांबळी यांचे कार्यालयात प्रवेश

समक्ष

(शिवाजी मा. माने)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

करुन त्यांना ताब्यात घेतील. अशा सुचना दिल्या. त्यानंतर सपोआ शिवाजी माने यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टचे आतील बाजुस लावला. मी व पंच श्री. म्हसाळ असे श्री. नयन कांबळी यांना लोकसेवकाने मागीतलेली लाचेची रक्कम देण्याकरीता त्यांचे कार्यालयात 'मनी २ मी' येथे गेलो. त्यावेळी पोलीस पथकाने आमचे पाठीमागून येवून कार्यालयाच्या अजूबाजूस सापळा लावला. मी, पंच श्री. म्हसाळ यांचेसह श्री. नयन कांबळी कार्यलयात पोहचलो तेव्हा ते तेथे उपस्थित नव्हते. तसा संदेश मी सपोआ शिवाजी माने यांचे मोबाईलवर एसएमएस पाठविला. सपोआ शिवाजी माने यांनी थांबून रहाणेबाबत एसएमएसवरुन मेसेज दिल्याने मी व पंच श्री. म्हसाळ श्री. नयन कांबळी यांचे वाट पहात थांबलो. बराचवेळ वाट पाहूनही श्री. नयन कांबळी हे कार्यालयात आले नाहीत म्हणून मी त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता श्री. नयन कांबळी यांनी कार्यालयात पैसे देण्यास सांगितले. परंतू मी त्यांना तुमच्याशी बोलायचे आहे असे सांगताच त्यांनी कार्यालयात ३० मिनिटात येत असल्याचे सांगितले व किती पैसे घेवून आलास अशी विचारणा केली त्यावर मी रु. १,७५,०००/— आणल्याचे सांगितले. त्यानंतर साधारण दुपारी ०१.४०वा. चे दरम्यान श्री. नयन कांबळी हे त्यांचे कार्यलयातील केबीनमध्ये आले. तेव्हा त्यांनी मला त्यांचे केबीनमध्ये बोलावले. मी त्यांच्या केबीनमध्ये गेलो तेव्हा त्यांनी मला पैशाबाबत विचारणा केली म्हणून मी श्री. नयन कांबळी यांना त्यांनी लोकसेवक श्री. संतोष गायकर यांच्याकरीता मागीतलेली लाचेची रक्कम रु. १,७५,०००/— त्यांच्या हातात दिली. श्री. नयन कांबळी यांनी मी दिलेली रक्कम मोजून त्यांचा चालक श्री. मोहित शर्मा यांचे हातात देवून ती कॅश काऊन्टरवर श्री. ओमप्रकाश सोनी यांचेकडे देण्यास सांगितली. श्री. मोहित शर्मा हे श्री. नयन कांबळी यांच्या केबीनमधून पैसे घेवून बाहेर आले तसा मीही त्यांचे मागून बाहेर आलो. श्री. मोहित शर्मा यांनी सदरची रक्कम स्वत: कॅश काऊन्टरवर जावून श्री. ओमप्रकाश सोनी यांचे हातात दिली. त्यानंतर मी ठरल्या प्रमाणे मी तोंडावर रुमाल फिरवून लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा पंच श्री. म्हसाळ यांना दिला. त्यानंतर पंच श्री. म्हसाळ यांनी सपोआ शिवाजी माने साहेब यांच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे ओके असा संदेश दिला. त्यानंतर सपोआ शिवाजी माने हे पंच क्रमांक २ व पथकासह 'मनी २ मी' या फायनान्स कंपनीच्या कार्यालयात आले. सपोआ शिवाजी माने यांनी पो.ह. साळुंखे व पो.ह पुजारी यांचेसह श्री. नयन कांबळी यांचे केबीनमध्ये जावून त्याना ताब्यात घेतले नंतर कॅश काऊन्टरवर जावून कॅशियर श्री. ओमप्रकाश सोनी यांना थांबवून त्यांचेकडे श्री. मोहित शर्मा यांनी जमा केलेली लाचेची रक्कम पंच क्र. २ यांनी ताब्यात घेतली. त्यानंतर कांबळी यांना

समक्ष

(स्वाक्षरी) 24/08/19

( शिवाजी मा. माने )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

(स्वाक्षरी) 24/08/2019

Scanned with OKEN Scanner

सोबत घेवून मिरारोड पोलीस ठाण्यास सापळा पथक घेवून पंचनामा कार्यवाही पुर्ण केली.

तरी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संतोष गायकर यांनी त्यांचेकडे तपासाधीन असलेल्या गुन्ह्याचे तपासात माझा कांही एक संबध नसताना मला गुन्हयातून बाहेर काढतो असे सांगून रु. २,००,०००/— लाचेची मागणी करुन 'मनी २ मी' फायनान्स प्रा.लि. या कंपनीचे संचालक श्री नयन कांबळी यांच्या मार्फतीने रु. १,७५,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी पोलीस निरीक्षक श्री. संतोष संतोष गायकर व श्री. नयन कांबळी यांचे विरुध्द कायदेशीर फिर्यादी आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून सदर जबाब मला वाचून व हिंदीत समजावून सांगितला आहे. सदर जबाब माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( शिवाजी मा. माने ) २४/०८/१९

सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

24/08/2019

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ — ........

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ — ........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक : ........ — ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी त्यांच्याकडे तपासाधीन असलेल्या गुन्ह्यात फिर्यादीचा सहभाग न दाखविण्याकरीता लाचेची मागणी करुन खाजगी इसम आरोपी क्रमांक २ यांच्यामार्फत ३,०५,०००/- रुपये कायदेशीर पारिश्रमिका खेरीज परितोषण म्हणुन लोकसेवका करीता स्विकारले म्हणुन गुन्हा ७,१२ भ्र.प्र.का. [illegible] १९८८ (सुधारीत २०१८) अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन अंतिम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
शिवाजी मारुती भाने. सहाय्यक पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ————, जिल्हा ————, राज्य ————,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........,
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name शिवाजी मारुती भाने (स.पो.आ.)
पदनाम Rank ........ ला.प्र.वि. मुंबई
तपासिक अं. चा कोड. क्रं.
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख २४/०८/२०१९
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner